पेजिनेशनसाठी
अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25


विश्वास पिढयान् पिढयांचा
काळे ज्वेलर्स
9601222777
9615222777
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १८५ । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | शनिवार ०१/०८/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेंद्रमध्ये बांधा !
मेन रोड, संगमनेर, फोन : ०२४२५ - २२५७४०, ७९०१०३११५५
१९५९ पासून
राजेंद्र
विश्वासाची सार्थ परंपरा...

# क्रांतिदिनी पुणे -नाशिक महामार्गावर चक्काजाम

## सरळ मार्गे रेल्वेसाठी निर्णायक लढा, ९ ऑगस्टला जनआंदोलन



- ९ ऑगस्ट (क्रांतिदिन) सकाळी ९ वाजता पुणे–नाशिक महामार्गावर चक्काजाम आंदोलन
- आमदार सत्यजीत तांबे यांची जनआंदोलनाची घोषणा
- नाशिक, अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यातील नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन
- सरळमार्गे पुणे–नाशिक रेल्वेच्या मागणीसाठी निर्णायक लढा
- 'हे कोणत्याही पक्षाचे नव्हे, तर जनतेच्या हक्काचे आंदोलन'
- 'अभी नहीं, तो कभी नहीं'च्या निर्धाराने एकजुटीचे आवाहन

युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - पुणे-नाशिक सरळमार्गे रेल्वेच्या बहुप्रतीक्षित प्रकल्पासाठी सुरू असलेला जनसंघर्ष आता निर्णायक टप्प्यात पोहोचला असून, केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी क्रांतिदिनानिमित्त शनिवार, ९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता पुणे-नाशिक महामार्गावर विविध ठिकाणी एकाच वेळी चक्काजाम जनआंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाची घोषणा विधानपरिषद आमदार सत्यजीत तांबे यांनी केली असून, नाशिक, अहिल्यानगर आणि पुणे या तीन जिल्ह्यांतील नागरिकांनी पक्षीय मतभेद बाजूला ठेवून मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

आमदार तांबे म्हणाले की, एका बाजूला केंद्रीय मंत्र्यांकडून हा रेल्वे प्रकल्प रद्द झाल्याचे सांगितले जात असले, तरी दुसऱ्या बाजूला लाखो नागरिकांच्या अपेक्षा आणि भावना आजही कायम आहेत. सरकारने केवळ नफा-तोट्याचा विचार न करता भविष्यातील गरज, प्रादेशिक विकास आणि जनहित लक्षात घेऊन या प्रकल्पाला मंजुरी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

हे आंदोलन कोणत्याही राजकीय पक्षाचे किंवा एका नेत्याचे नाही. हा आपल्या हक्कासाठी लढणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांचा आणि भूमिपुत्रांचा लढा आहे. रेल्वेसारखे प्रकल्प शंभर वर्षांत एकदाच उभे राहतात. आज ही संधी हातची गेली, तर पुढील अनेक पिढ्यांना त्याची किंमत मोजावी लागेल, असे तांबे यांनी स्पष्ट केले. पुणे-नाशिक सरळमार्गे रेल्वे हा केवळ वाहतुकीचा विषय नसून उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्राच्या आर्थिक, औद्योगिक, कृषी, शैक्षणिक, पर्यटन आणि रोजगार विकासाचा पायाअसल्याचे आंदोलनकर्त्यांचे मत आहे. (पान २ वर)

### महामार्गावर एकजूट दाखविण्याचे आवाहन

९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता पुणे–नाशिक महामार्गावरील विविध ठिकाणी एकाच वेळी चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. केंद्र सरकारला जागे करण्यासाठी आता जनतेनेच रस्त्यावर उतरले पाहिजे. इतिहास साक्षी आहे, जेव्हा जनता एकजूट होते तेव्हा सरकारला निर्णय घ्यावाच लागतो, असे आमदार तांबे यांनी ठामपणे सांगितले.

## रखडलेल्या झेडपीच्या निवडणुका लवकरच

मुंबई (वृत्तसंस्था)
राज्यातील रखडलेल्या जिल्हा परिषद निवडणुकांचा मार्ग आता मोकळा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात निवडणुका घेण्याची तयारी दर्शविल्याने डिसेंबर महिन्यात जिल्हा परिषद निवडणुका होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, या निवडणुका ५० टक्के आरक्षण मर्यादेत घेण्यात आल्यास अनेक जिल्ह्यांतील आरक्षणाच्या समीकरणात मोठे बदल होण्याची शक्यता आहे. याचा सर्वाधिक परिणाम नागपूर जिल्हा परिषदेत दिसून येऊ शकतो. सध्याच्या आरक्षणाच्या आराखड्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या निकषांनुसार एकूण ५७ जागांपैकी ३३ जागा विविध प्रवर्गांसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत.

या ३३ आरक्षित जागांमध्ये इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी १५ जागा, अनुसूचित जाती यांच्यासाठी १० जागा आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी ८ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार ५० टक्के आरक्षण मर्यादेचे पालन करून निवडणुका झाल्यास एकूण ५७ जागांपैकी केवळ २७ जागाच आरक्षित ठेवता येणार आहेत. त्यामुळे सध्याच्या ३३ आरक्षित जागांऐवजी २७ जागांवरच आरक्षण लागू राहण्याची शक्यता आहे. यामुळे सर्वाधिक परिणाम ओबीसी आरक्षणावर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या ओबीसींसाठी राखीव असलेल्या १५ जागांपैकी पाच जागा कमी होऊन केवळ १० जागाच ओबीसींसाठी आरक्षित राहू शकतात. त्यामुळे नागपूर जिल्हा परिषदेत राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होण्याची शक्यता आहे.

## अकोले नगर पंचायतीच्या अध्यक्षपदी सोनाली नाईकवाडी यांची निवड

युवावार्ता (प्रतिनिधी)
अकोले -अकोले नगरपंचायतीचे नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे यांच्यावरील अविश्वास ठराव मंजूर झाल्यानंतर रिक्तझालेल्या नगराध्यक्षपदासाठी शुक्रवारी झालेल्या निवडणुकीत भाजपच्या सोनाली चेतन नाईकवाडी यांनी ११ विरुद्ध ६ मतांनी विजय मिळवत दुसऱ्यांदा नगराध्यक्षपदाचा मान पटकावला. त्यांनी वैष्णवी सोमेश्वर धुमाळ यांचा पराभव केला.



नगराध्यक्ष निवडणुकीची प्रक्रिया सकाळी ११ वाजता प्रांताधिकारी तथा पीठासीन अधिकारी अरुण उंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. निवडणुकीत नगरपंचायतीच्या सर्व १७ नगरसेवकांनी सहभाग घेतला. मतदानानंतर सोनाली नाईकवाडी यांच्या बाजूने ११ नगरसेवकांनी कौल दिला, तर वैष्णवी धुमाळ यांना ६ मते मिळाली. त्यानंतर पीठासीन अधिकारी अरुण उंडे यांनी सोनाली नाईकवाडी यांना अधिकृतपणे विजयी घोषित केले.

या निवडणुकीत भाजपमधील दोन गटांमध्ये थेट सामना झाल्याने स्थानिक राजकारणाचे लक्ष या निवडणुकीकडे लागले होते. माजी आमदार वैभव पिचड यांच्या नेतृत्वाखालील गटाने वैष्णवी धुमाळ यांना उमेदवारी दिली होती. दुसरीकडे, भाजपच्या राज्य सचिव सोनाली नाईकवाडी यांनी स्वतंत्र उमेदवारी दाखल करत निवडणुकीच्या रिंगणात प्रवेश केला. (पान २ वर)

## आ. अमोल खताळ यांची याचिका फेटाळली

युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - शिंदे गटाचे संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल खताळ यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या निर्णयाविरोधात आमदार खताळ यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली विशेष अनुमती याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे अमोल खताळ यांची आमदारकी धोक्यात येण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या वेळी निवडणूक प्रतिज्ञापत्रात चुकीची आणि अपूर्ण माहिती दिल्याचा गंभीर आरोप करत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी आमदार अमोल खताळ यांच्याविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. ही याचिका सुरुवातीलाच फेटाळून लावावी, अशी विनंती आमदार खताळ यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाकडे केली होती. मात्र, उच्च न्यायालयाने खताळ यांची ही मागणी फेटाळून लावत त्यांच्याविरोधात रीतसर खटला चालवण्याचे स्पष्ट आदेश दिले होते.



खताळ यांनी हायकोर्टातील सुनावणीत आपण सध्या त्या फर्मचे भागीदार नसल्याचा आणि फर्म विसर्जित झाल्याचा दावा केला. मात्र, थोरात यांनी जीएसटी संकेतस्थळावरील नोंदी सादर करून फर्म सक्रिय असल्याचे दाखवले. न्यायालयाने या टप्प्यावर खताळ यांचा बचाव ग्राह्य धरता येणार नसल्याचे स्पष्ट केले. उच्च न्यायालयाच्या या दणक्यांनंतर आमदार अमोल खताळ यांनी तातडीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेत विशेष अनुमती याचिका (डड्झ) दाखल केली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयानेही उच्च न्यायालयाचा निकाल कायम ठेवत खताळ यांची याचिका फेटाळून लावली आहे. त्यामुळे आता त्यांच्याविरोधात उच्च न्यायालयात रीतसर सुनावणी आणि खटला चालणार असून, या कायदेशीर लढाईत खताळ यांची आमदारकी रद्द होणार का? याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि संगमनेरचे उमेदवार बाळासाहेब थोरात यांचे वकील ड अमित कारंडे यांनी सांगितले की, संगमनेर विधानसभा मधील निवडणूक प्रतिज्ञापत्रात अमोल खताळ यांनी व्यावसायिक भागीदारी लपविली आहे, त्यामुळे त्यांची निवड रद्द करावी अशी याचिका हायकोर्टात केली आहे. या विरोधात अमोल खताळ यांनी विशेष अनुमती याचिका सुप्रीम कोर्टात दाखल केली होती मात्र सुप्रीम कोर्टाने याचिका फेटाळली आहे. यापुढे मुंबई हायकोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठात सुनावणी होईल. कोर्टाने सांगितले की एक रूपया जरी असेल तरी नियमानुसार कारवाई करावी लागेल. आता, आम्ही निवडणूक याचिका जिंकण्यासाठी आम्ही प्रयत्न करू, त्यानंतर खताळ यांची निवडणूक रद्द होईल असे वकिलांनी सांगितले.

(पान ४ वर)










Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
- अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
- माफक दरात - संगमनेर येथेच
- 105 बेड्स
- तज्ञ डॉक्टर्स
- अत्याधुनिक सुविधा

कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध

हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532 24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# अजिंक्यचा प्रवास तरुणांसाठी प्रेरणादायी - माजी मंत्री थोरात

## आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील उल्लेखनीय कारकिर्दीनंतर निवृत्ती



युवावार्ता (प्रतिनिधी) -- संगमनेर तालुक्याचे सुपुत्र अजिंक्य रहाणे यांनी आपल्या शांत, संयमी आणि विश्वासपूर्ण खिलाडूवृत्तीने जागतिक पातळीवर आपली मोठी ओळख निर्माण केली. भारतीय संघाला ऑस्ट्रेलियामध्ये कसोटीत ऐतिहासिक विजय मिळवून देण्याची कामगिरी त्यांनी केली असून कसोटी वनडे आणि टी-२० सर्वांमध्ये त्यांनी भारतीय क्रिकेटसाठी दिलेले योगदान हे अहिल्यानगर जिल्ह्यासाठी सदैव अभिमानास्पद असल्याचे गौरवउद्गार काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा. महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले असून अजिंक्य रहाणे यांच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील क्रिकेटमधून निवृत्तीने सर्वांना हुरहुर लागली असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी गावचे असलेले अजिंक्य रहाणे यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपला मोठा दबदबा निर्माण केला. त्यांनी आज आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून आपली निवृत्ती जाहीर केली. त्यामुळे देशभरातील त्यांच्या तमाम चाहत्यांना मोठा धक्का बसला.

यानंतर बोलताना मा. महसूलमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, अजिंक्य रहाणे यांनी सातत्य, चिकाटी आणि मोठ्या जिद्दी मधून भारतीय संघामध्ये आपले स्थान निर्माण केले. शांत संयमी आणि विश्वासार्त असलेला खेळाडू अशी त्यांची ओळख निर्माण झाली. संगमनेरच्या माती पासून निघालेल्या त्यांचा प्रवास आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचला. अजिंक्यच्या नेतृत्वामध्ये भारतीय क्रिकेट संघाने ऑस्ट्रेलिया मध्ये कसोटी मालिकेत विजय मिळवला हा देशासाठी अभिमानास्पद क्षण होता.

भारताचा महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड यांच्यासारख्या वरिष्ठ क्रिकेटपटून बरोबर त्याने अनेक भागीदारी केल्या. आयपीएलमध्ये ही सातत्याने चांगली कामगिरी राहिली. मागील दोन वर्षापासून केकेआर चे नेतृत्व त्यांनी केले. आंतरराष्ट्रीय पातळीवर क्रिकेट खेळत असताना संगमनेरच्या मातीशी कायम नाळ घट्ट ठेवली. विविध समारंभ किंवा घरगुती कार्यक्रमांसाठी ते संगमनेरला आवर्जून आले.

याचबरोबर संगमनेर मधील निवेदित क्रिकेटपटूंना आपण मार्गदर्शन करण्यासाठी सदैव तयार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यांचा हा प्रवास असंख्य तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. मोठ्या जबाबदारीने खेळणे, संघहिताला नेहमी वैयक्तिक यशापेक्षा प्राधान्य देणे आणि कोणताही गाजावाजा न करता सातत्याने आपली जबाबदारी पार पाडणे हीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख ठरली आहे.

त्यांच्या निवृत्तीने तमाम क्रीडापटूंच्या मनामध्ये हुरहुर निर्माण झाली असून संगमनेर तालुक्याच्या सुपुत्र अजिंक्य रहाणे यांचे क्रिकेट मधील योगदान हे देशासाठी अहिल्यानगर जिल्ह्यासाठी आणि संगमनेर तालुक्यासाठी सदैव अभिमानास्पद राहील असे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे.

भारतीय क्रिकेट संघातील क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे यांनी लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वात होणाऱ्या विविध कार्यक्रमांना कायम उपस्थिती दर्शवली. तर प्रत्येक कार्यक्रमांमध्ये माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनीही अजिंक्य रहाणे यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. अमृतवाहिनी येथील मेधा, जय हिंद क्रिकेट स्पर्धा सहकार महर्षी क्रिकेट चषक यांच्यासह विविध कार्यक्रमांना ते उपस्थित राहिल.

### अजिंक्य रहाणेंनी संगमनेरचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर नेले- आ. तांबे

**संगमनेर तालुका माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील विकसित तालुका म्हणून ओळखला जातो. याचबरोबर या तालुक्यातील सुपुत्र अजिंक्य रहाणे यांनी आपल्या कर्तुत्वाने तालुक्याचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर नेले असून त्यांच्या निवृत्तीने सर्वांना हळहळ लागली आहे. आपला अजिंक्य ही त्यांची ओळख संगमनेरकरांसाठी कायम असून संगमनेरच्या विविध कार्यक्रमांमधून त्यांनी सातत्याने युवकांना मार्गदर्शन केले आहे. यापुढील काळातही ते आपल्या तालुक्यातील युवकांना मार्गदर्शन करतील. याचबरोबर संगमनेर मधील युवकांसाठी जयहिंदच्या माध्यमातून क्रिकेट कॅडमी साठी ही ते मार्गदर्शन करतील असा विश्वास आमदार सत्यजित तांबे यांनी व्यक्त केला.**

### थँक्यू अजिंक्य--डॉ. जयश्रीताई थोरात

**आपल्या तालुक्याचे सुपुत्र अजिंक्य रहाणे यांनी संगमनेरचे नाव देशात आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर झळकवले. अजिंक्य रहाणे जेव्हा मैदानावर खेळण्यासाठी यायचे तेव्हा प्रत्येक संगमनेरकर अभिमानाने सांगायचा की हा आमचा अजिंक्य आहे. देशासाठी आणि क्रीडा क्षेत्रासाठी दिलेल्या समर्पित भावनेतील योगदानाबद्दल तमाम संगमनेरकरांच्या वतीने थँक्यू अजिंक्य म्हणत तुमचा आम्हा सर्वांना गर्व असल्याचे संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ जयश्रीताई थोरात यांनी म्हटले आहे.**

## रविवारी संगमनेर-शिर्डी पायी पालखी सोहळा

युवावार्ता (प्रतिनिधी)



संगमनेर - ओम साई चॅरिटेबल संस्था, संगमनेर संचलित श्री साईनाथ मंदिर ओम साई ग्रुप यांच्या वतीने संगमनेर ते शिर्डी पायी पालखी सोहळा रविवारी (दि. ०९) प्रवरा नदी परिसरातील श्री साई मंदिर येथून आयोजित करण्यात आला आहे. यंदाचे हे १७वे वर्ष आहे. सकाळी ६. ३० वाजता मिरवणुकीद्वारे पालखीचे प्रस्थान होईल. रात्री ८ वाजता शिर्डी येथे दर्शन करून पालखी पुन्हा संगमनेरकडे रवाना होईल, अशी माहिती संस्थापक-अध्यक्ष प्रसाद मयूर यांनी दिली.

८ ऑगस्टपर्यंत पायी पालखी नियोजनाकरिता नावे नोंदवावी, पायी पालखी सोहळ्यात सहभागी होताना नियम व अटींचे पालन करणे गरजेचे आहे. संगमनेर शहरातील साई मंदिर-रंगारगल्ली-कॅप्टन लक्ष्मी चौक-नगर परिषद-मेनरोड-दिल्ली नाका-समनापूर-तळेगाव दिघे फाटा-निळवंडे-कौठे कमळेश्वर-काकडी-कोऱ्हाळे-नांदुखी-शिर्डी असा पालखीचा मार्ग असेल. ही पालखी साईबाबांच्या भक्तीभावातून निघणारी असून तिचा कोणत्याही राजकीय पक्ष अथवा संघटनेशी कोणताही संबंध नाही. भाविकांनी मोठ्या संख्येने पालखी सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यक्ष योगेश काजळे, उपाध्यक्ष ऋषिकेश शहाणे, खजिनदार सम्राट भंडारी, सचिव कपील टाक, विश्वस्त सुदर्शन नावंदर, संकेत काजळे, निलेश लाहोटी, नम्रता मयूर यांनी केले आहे.मयूर यांनी केले आहे.

## एसटीच्या स्मार्ट कार्डसाठी मुदतवाढ

मुंबई (वृत्तसंस्था)

एसटी प्रवासातील शासकीय सवलतींसाठी अनिवार्य केलेल्या एनसीएमसी स्मार्ट कार्डच्या निर्णयाला परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. कार्ड न मिळाल्यामुळे प्रवाशांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी हा निर्णय घेतला असून, पात्र नागरिकांना या वाढीव मुदतीत प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

एसटी महामंडळाच्या वतीने प्रवासात विविध सवलतीचा अनिवार्य करण्यात आलेल्या एनसीएमसी स्मार्ट कार्डच्या निर्णयाला १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ज्येष्ठ नागरिक आणि महिलांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्य शासनाकडून अमृत ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, तर ज्येष्ठ नागरिक व महिलाना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत दिली जाते. ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी १ ऑगस्टपासून एनसीएमसी स्मार्ट कार्ड सक्तीचे करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, अनेक पात्र प्रवाशांनी नोंदणी करूनही त्यांना अद्याप प्रत्यक्ष कार्ड मिळालेले नाही.

## पान १ वरून अकोले...

निवडणुकीत सोनाली नाईकवाडी यांच्या बाजूने भाजपमधील अनेक नगरसेवकांसह शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांनी पाठिंबा दिला. तर वैष्णवी धुमाळ यांना भाजपच्या काही नगरसेवकांसह काँग्रेसच्या एका नगरसेवकाचा पाठिंबा मिळाल्याचे चित्र मतदानातून स्पष्ट झाले. या निकालानंतर अकोले नगरपंचायतीतील राजकीय समीकरणांमध्ये बदल झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. भाजपमधील अंतर्गत गटबाजी पुन्हा एकदा समोर आली असून आगामी फेब्रुवारी २०२७ मध्ये होणाऱ्या नगरपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या निकालाकडे महत्त्वाच्या राजकीय घडामोडी म्हणून पाहिले जात आहे. सोनाली नाईकवाडी या यापूर्वी अकोले नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा म्हणून कार्यरत होत्या. त्यांनी भाजपच्या अकोले तालुकाध्यक्षा, त्यानंतर अहिल्यानगर जिल्हाध्यक्षा म्हणूनही जबाबदारी सांभाळली असून अलीकडेच त्यांची भाजपच्या राज्य सचिवपदी नियुक्ती झाली आहे. नगराध्यक्षपदावरील या विजयामुळे त्यांच्या नेतृत्वाला स्थानिक पातळीवर नव्याने बळ मिळाल्याची चर्चा आहे.

## कुंभमेळ्याआधी शिर्डी विमानतळावरील एअर कार्गो सुविधा सुरु -मुख्यमंत्री

मुंबई (वृत्तसंस्था)

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारणीचा यशस्वी अनुभव लक्षात घेऊन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी)ने पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विकासही निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील एअर कार्गो कॉम्प्लेक्ससह विविध पायाभूत सुविधा आगामी कुंभमेळा-२०२७ पूर्वी पूर्ण करण्यासाठी आवश्यक यंत्रणा बळकट करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या (एमएडीसी) संचालक मंडळाची ९३ वी बैठक मंत्रालयात झाली. बैठकीस एमएडीसीचे कार्यकारी संचालक दीपक कपूर, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बलगन, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, आयुक्त विपिन इटनकर तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.(मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त कंपनीमध्ये एमएडीसीसोबत सिडको, एमआयडीसी आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांचा सहभाग असून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी हडकोमार्फत ६ हजार कोटी रुपयांच्या कर्जास मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती देत सर्व कामे नियोजित वेळेत पूर्ण करावीत.कुंभमेळा-२०२७ दरम्यान देश-विदेशातून मोठ्या संख्येने भाविक शिर्डीत येणार असून चार्टर्ड विमानांचीही मोठ्या प्रमाणात ये-जा अपेक्षित आहे. त्यामुळे शिर्डी विमानतळावरील टॅक्सीवे, एप्रन, एअर कार्गो कॉम्प्लेक्स तसेच इतर आवश्यक सुविधांची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

## पान १ वरून क्रांतिदिनी पुणे -नाशिक महामार्गावर...

या रेल्वेमुळे प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होईल, उद्योग-व्यवसायांना चालना मिळेल, नवीन गुंतवणूक वाढेल आणि हजारो रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

सध्याच्या परिस्थितीत पुणे-नाशिक दरम्यानचा प्रवास दिवसेंदिवस अधिक कष्टदायक होत चालला आहे. पूर्वी दोन ते तीन तासांत होणाऱ्या प्रवासासाठी आता वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरवस्था आणि वाढत्या वाहनसंख्येमुळे सहा ते सात तास खर्च करावे लागत असल्याचे तांबे यांनी सांगितले. या मार्गावरून दररोज हजारो विद्यार्थी, नोकरदार, उद्योजक, व्यापारी आणि व्यावसायिक प्रवास करत असल्याने सरळ रेल्वे मार्गाची आवश्यकता अधिक तीव्र झाली आहे. या रेल्वे प्रकल्पामुळे सिन्नर, संगमनेर, अकोले, नारायणगाव, मंचर, राजगुरूनगर, चाकण यांसह संपूर्ण परिसराला विकासाची नवी दिशा मिळेल. तसेच पुणे आणि नाशिक या दोन्ही शहरांवरील वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होऊन उद्योग, व्यापार आणि पर्यटन क्षेत्रालाही मोठी चालना मिळेल, असे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

शेवटी त्यांनी नागरिकांना आवाहन करताना म्हटले की, हे आंदोलन कोणत्याही पक्षासाठी किंवा व्यक्तीसाठी नसून भावी पिढ्यांच्या भविष्यासाठी आहे. त्यामुळे शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी, उद्योजक, कामगार, नोकरदार, सामाजिक संघटना आणि सर्वसामान्य नागरिकांनी एकत्र येऊन या जनआंदोलनात सहभागी व्हावे.

'अभी नहीं, तो कभी नहीं' या निर्धाराने ९ ऑगस्टच्या जनआंदोलनात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून पुणे-नाशिक सरळमार्गे रेल्वेच्या मागणीसाठी एकजुटीची ताकद दाखविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आता या आंदोलनाकडे राज्य सरकार, केंद्र सरकार आणि संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले असून, तीन जिल्ह्यांच्या विकासाचा मार्ग मोकळा करणाऱ्या या रेल्वे प्रकल्पाबाबत पुढे काय निर्णय होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## वंदे मातरमचा अपमान कराल तर ३ वर्षांचा तुरुंगवास - कायदा मंजूर

मुंबई (वृत्तसंस्था)

आता भारताचे राष्ट्रीय गीत असलेल्या 'वंदे मातरम'चा अवमान करणे कायदेशीर गुन्हा ठरणार आहे. वंदेमातरमचा अवमान करणाऱ्याला तीन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. यासंदर्भातील महत्त्वपूर्ण विधेयक आज संसदेने मंजूर झाले. राज्यसभेत आधीच मंजूर झालेले हे विधेयक गुरुवारी विरोधी पक्षांच्या प्रचंड गदारोळात आणि सभात्यागात लोकसभेतही ध्वनीमताने मंजूर झाले. आता, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या स्वाक्षरीनंतर या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होईल. हे नवीन विधेयक, 'राष्ट्रीय सन्मानाचा अवमान प्रतिबंधक कायदा, १९७१' मध्ये सुधारणा करते. यापूर्वी, या कायद्यात केवळ राष्ट्रध्वज, भारतीय संविधान आणि राष्ट्रगीत यांचा अनादर केल्यास तीन वर्षांच्या शिक्षेची तरतूद होती. आता यामध्ये राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम'चाही समावेश करण्यात आला आहे. यामुळे आता, वंदे मातरम गाताना अडथळा निर्माण करणे, गीताचा अनादर करणे अथवा गोंधळ घालणे यासाठी ३ वर्षांचा तुरुंगवास, दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. महत्वाचे म्हणजे, वंदे मातरमच्या १५० व्या जयंती वर्षात, हे ऐतिहासिक विधेयक संसदेत मंजूर झाले आहे. काँग्रेसने ७६ वर्षे तुष्टीकरणाचे राजकारण केल -या विधेयकासंदर्भात बोलताना, गृहराज्यमंत्री नित्यानंद राय म्हणाले, काँग्रेसने आपल्या ७६ वर्षांच्या सत्ताकाळात वंदे मातरम या गीताला ज्या प्रकारे सन्मान मिळायला हवा होता, तो दिला नाही. उलट त्यांनी तुष्टीकरणाचे राजकारण केले. आता भाजपच्या नेतृत्वाखाली मोदी सरकार या राष्ट्रियगीताला खरा सन्मान मिळवून देत आहे.. एवढेच नाही तर, 'एक भारत, श्रेष्ठ भारत' साकारण्यासाठी सर्वांनी वंदे मातरमच्या सर्वच्या सर्व ६ कडव्यांचे गायन करायला हवे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले

## लोकशाहीर अण्णा भाऊ साठे : जागतिक पातळीवर पोहोचलेला मराठी साहित्याचा तेजस्वी दीपस्तंभ



मराठी साहित्यविश्वात आपल्या लेखणीच्या सामर्थ्याने सामान्य माणसाच्या जीवनाला शब्द देणारे, शोषित-वंचितांच्या वेदनांना वाचा फोडणारे आणि सामाजिक परिवर्तनाची मशाल पेटवणारे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे केवळ एक साहित्यिक नव्हते, तर ते जनतेच्या संघर्षाचे प्रखर प्रतिनिधी होते. १ ऑगस्ट रोजी त्यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रासह देशभरात त्यांना अभिवादन केले जात आहे. आपल्या साहित्यातून त्यांनी उपेक्षित समाजाचे दुःख, संघर्ष, स्वाभिमान आणि जगण्याची उमेद प्रभावीपणे मांडली.

अण्णा भाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांचे बालपण गेले. आर्थिक अडचणी, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक विषमता यांचा त्यांनी जवळून अनुभव घेतला. मात्र या परिस्थितीसमोर न झुकता त्यांनी आपल्या अनुभवांना साहित्याची ताकद दिली. औपचारिक शिक्षण कमी असले तरी जीवनाच्या विद्यापीठातून मिळालेल्या ज्ञानाच्या जोरावर त्यांनी मराठी साहित्याला नवा आयाम दिला. अण्णा भाऊ साठे यांनी कथा, कादंबरी, पोवाडे, लावण्या आणि लोकनाट्याच्या माध्यमातून समाजातील वास्तव मांडले. त्यांच्या लेखणीतून शेतकरी, कामगार, कष्टकरी, दलित आणि वंचित घटकांचे जीवन जिवंत झाले. 'फकिरा' ही त्यांची अजरामर कादंबरी मराठी साहित्याचा एक मानाचा ठेवा मानली जाते. या कादंबरीत त्यांनी अन्यायाविरुद्धचा संघर्ष, स्वाभिमान आणि बंडखोरीची भावना प्रभावीपणे मांडली. 'फकिरा'मधील नायक केवळ एका व्यक्तीचे चित्रण नसून अन्यायाविरोधात उभ्या राहणाऱ्या सामान्य माणसाचे प्रतीक आहे.

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची दखल केवळ महाराष्ट्रानेच नव्हे तर जगाने घेतली. त्यांच्या साहित्याचे विविध भाषांमध्ये अनुवाद झाले. रशियासारख्या देशातही त्यांच्या साहित्याचा गौरव झाला. एका अशिक्षित कष्टकरी कुटुंबातून आलेल्या व्यक्तीने आपल्या प्रतिभेच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचणे ही भारतीय साहित्यविश्वासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांनी आपल्या लेखणीतून माणुसकी, समता आणि सामाजिक न्यायाचा संदेश जगभर पोहोचवला.

अण्णा भाऊ साठे हे लोकशाहीर म्हणूनही प्रसिद्ध होते. त्यांनी शाहिरीच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. त्यांच्या पोवाड्यांमध्ये संघर्षाची ऊर्जा होती, तर लावण्यांमध्ये सामाजिक संदेश होता. कला ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाज बदलण्याचे प्रभावी माध्यम आहे, हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले. आजही अण्णा भाऊ साठे यांचे विचार समाजासाठी प्रेरणादायी आहेत. जात, धर्म, भाषा आणि आर्थिक विषमता यापलीकडे जाऊन माणसाला माणूस म्हणून सन्मान मिळावा, हा त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. त्यांनी आपल्या साहित्यातून स्वाभिमान, समानता आणि न्याय यासाठी आवाज उठवला.

अण्णा भाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' मिळावा, अशी मागणी आज मातंग समाजासह विविध सामाजिक संघटनांकडून केली जात आहे. मराठी साहित्य, लोककला आणि सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रातील त्यांचे योगदान लक्षात घेता ही मागणी सातत्याने पुढे येत आहे. भारतरत्न हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून समाजातील उपेक्षित घटकांच्या संघर्षाचा आणि योगदानाचा गौरव ठरेल, अशी भावना व्यक्त केली जात आहे. आजच्या नव्या पिढीने अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य वाचणे आणि त्यांचे विचार समजून घेणे गरजेचे आहे. कारण त्यांनी दाखवून दिले की परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द, प्रतिभा आणि सामाजिक बांधिलकीच्या जोरावर इतिहास घडवता येतो.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे मराठी साहित्याचे वैभव, सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते आणि जगभर पोहोचलेले महान साहित्यिक होते. त्यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांना अभिवादन करताना, त्यांच्या साहित्याचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे
मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे
मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# शिक्षक बँकेला आठ कोटींचा नफा - घुले

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ७ कोटी ९६ लाख १४ हजारांचा विक्रमी निव्वळ नफा कमावत आर्थिकदृष्ट्या दमदार कामगिरीची नोंद केली आहे. आवश्यक तरतुदी वगळल्यानंतर सभासदांना ६.१० टक्के लाभांश देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्याला वार्षिक सर्वसाधारण सभेची मंजुरी घेतली जाणार आहे. याशिवाय सभासदांच्या कायम ठेवींवर ७ टक्के दराने १५.४५ कोटी व्याज यापूर्वीच त्यांच्या खात्यात जमा करण्यात आल्याची माहिती बँकेच्या अध्यक्ष सरस्वती घुले यांनी दिली.

शिक्षक बँकेची १०७ व्या वार्षिक सर्वसाधारण रविवार (ता. २) होणार आहे. या सभेच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. घुले म्हणाल्या, की कर्जावरील व्याजदरात कोणतीही वाढ न करता शैक्षणिक, गृह, वाहन आणि जामीन कर्जासह सर्व कर्जयोजना पूर्वीच्या दरातच सुरू ठेवत बँकेने विक्रमी नफा मिळवला आहे. विशेष म्हणजे, गेल्या नऊ वर्षांपासून कोणत्याही कर्जावरील व्याजदरात वाढ करण्यात आलेली नाही.

उपाध्यक्ष शिवाजी कराड म्हणाले, बापूसाहेब तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सभासदहिताचा कारभार सुरू असून तो भविष्यातही कायम राहील. मार्चअखेर बँकेच्या ठेवी १ हजार ६३३ कोटींवर पोहोचल्या आहे. केवळ एका वर्षात जवळपास १०० कोटींची वाढ झाली आहे. सभासदांच्या कायम ठेवींमध्येही १२ कोटींची वाढ होऊन त्या २३१ कोटींवर पोहोचल्या आहेत.

# पेपर लीक, कॉपी आणि गैरप्रकारांवर कठोर कारवाई - पंतप्रधान मोदी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)



सार्वजनिक परीक्षा प्रक्रियेत होणारी पेपर लीक आणि इतर गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने आणलेल्या पब्लिक एक्झामिनेशन्स (प्रिव्हेन्शन ऑफ अनफेअर मीन्स) दुरुस्ती विधेयक, २०२६' अर्थात अँटी-पेपर लीक विधेयकाला संसदेची अंतिम मंजुरी मिळाली आहे. लोकसभेनंतर राज्यसभेनेही गुरुवारी या विधेयकाला मंजुरी दिली.

या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया वर एक व्हिडिओ रील शेअर करत सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले. देशात विश्वासार्ह, पारदर्शक आणि सक्षम परीक्षा व्यवस्था उभारण्यासाठी केंद्र सरकार सातत्याने ठोस पावले उचलत असल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, गेल्या अनेक दशकांपासून देशातील विविध राज्य सरकारे आणि केंद्र सरकारला पेपर लीकच्या समस्येला सामोरे जावे लागले आहे. या प्रकारांमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर परिणाम झाला असून अनेकांचे करिअर धोक्यात आले आहे. त्यामुळे या समस्येवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.देशातील परीक्षा प्रणाली अधिक मजबूत करण्यासाठी सरकार विविध स्तरांवर सुधारणा राबवत असल्याचे मोदी यांनी सांगितले. यामध्ये फास्ट ट्रॅक यंत्रणा उभारणे, तज्ज्ञांच्या सूचना विचारात घेणे, तसेच राज्य सरकारांशी समन्वय साधून आवश्यक बदल करणे यांचा समावेश असल्याचे त्यांनी नमूद केले.परीक्षा व्यवस्थेत केवळ कायदा करून सुधारणा शक्य नसून संस्थात्मक बदलही आवश्यक असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले.

# ग्रीनप्रो मानांकनाने बिझ इंटरनॅशनलची मान उंचावली

## पर्यावरणपूरक उत्पादनासाठी CII कडून राष्ट्रीय गौरव

युवावार्ता (प्रतिनिधी)



संगमनेर-भारतीय उद्योगविश्वात गुणवत्ता, नावीन्य आणि पर्यावरणपूरक उत्पादनासाठी वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या बिझ इंटरनॅशनलने आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. भारतीय उद्योग परिसंघ (सीआयआय) तर्फे दिल्या जाणाऱ्या देशातील प्रतिष्ठेच्या ग्रीनप्रो प्रमाणपत्राने कंपनीला दरवाजे व खिडक्या या श्रेणीत सन्मानित करण्यात आले आहे. पर्यावरणपूरक, ऊर्जा कार्यक्षम आणि शाश्वत उत्पादन पद्धती स्वीकारणाऱ्या मोजक्या कंपन्यांनाच हा सन्मान मिळत असल्याने ही उपलब्धी विशेष मानली जात आहे. ग्रीनप्रो हे आयएसओ १४०२४ मानकांवर आधारित आणि जागतिक पर्यावरणीय प्रमाणन जाळे (जीईएन) मान्यताप्राप्त भारतातील अग्रगण्य पर्यावरणीय प्रमाणन आहे.

हा सन्मान पुण्यातील द वेस्टिन येथे झालेल्या ९व्या सीआयआय ग्रीनप्रो शिखर परिषद २०२६मध्ये प्रदान करण्यात आला. लोढा समूहाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते कंपनीचे संचालक कपील चांडक यांनी पुरस्कार स्वीकारला.

ग्रीनप्रो प्रमाणपत्र हे केवळ उत्पादनाच्या गुणवत्तेचे नव्हे, तर संपूर्ण जीवनचक्राचे मूल्यमापन करणारे प्रमाणन आहे. कच्चा माल, ऊर्जा व पाण्याचा वापर, कार्बन उत्सर्जन, पुनर्वापर क्षमता, पर्यावरणावरील परिणाम, ग्राहक सुरक्षितता आणि शाश्वत विकासातील योगदान अशा निकषांवर सखोल तपासणीनंतरच हे प्रमाणपत्र दिले जाते. बिझ इंटरनॅशनलने सुरुवातीपासूनच गुणवत्ता आणि शाश्वतता हे धोरण स्वीकारत अत्याधुनिक तंत्रज्ञान, जागतिक दर्जाची उत्पादन प्रक्रिया आणि ग्राहककेंद्री सेवा यावर भर दिला आहे. कंपनीची अॅल्युमिनियम दरवाजे, खिडक्या, सरकती प्रणाली, दर्शनी भागासाठीची संरचना आणि इतर वास्तुशास्त्रीय उत्पादने गुणवत्ता, मजबुती, आकर्षक रचना व ऊर्जा कार्यक्षमतेसाठी देशभरात प्रसिद्ध आहेत. निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक प्रकल्पांमध्ये या उत्पादनांना मोठी मागणी आहे. हरित इमारती आणि ऊर्जा बचतीचे महत्त्व वाढत असताना ग्रीनप्रो प्रमाणपत्रामुळे कंपनीच्या उत्पादनांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अधिक विश्वासार्हता आणि स्पर्धात्मक बळ मिळणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

या यशामागे दूरदृष्टीचे नेतृत्व, अत्याधुनिक उत्पादन सुविधा, गुणवत्ता नियंत्रण, संशोधन-विकासाला दिलेले प्राधान्य आणि कर्मचाऱ्यांचे समर्पित योगदान असल्याचे कंपनीने सांगितले. पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकास ही उद्योगाच्या भविष्यासाठी आवश्यक गुंतवणूक असल्याचा संदेशही या सन्मानातून अधोरेखित झाला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल कंपनीचे संचालक, अधिकारी, अभियंते, कर्मचारी, व्यावसायिक भागीदार आणि ग्राहकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, संगमनेरसह महाराष्ट्राचे नाव राष्ट्रीय स्तरावर उंचावणारी ही अभिमानास्पद उपलब्धी असल्याची भावना व्यक्त होत आहे. गुणवत्ता, नवोन्मेष, पर्यावरणपूरक उत्पादन आणि ग्राहकांचा विश्वास या चार मजबूत स्तंभांवर उभी असलेली बिझ इंटरनॅशनल भविष्यातही अशीच यशस्वी वाटचाल करत राहील, असा विश्वास उद्योगविश्वाने व्यक्त केला आहे.

युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
पाहिजेत
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३१४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची

# जुलै फॉर काइंडनेस मधून सकारात्मकता वाढीस मोठी मदत - डॉ.जयश्रीताई थोरात




संगमनेर ( प्रतिनिधी ) समाजामध्ये वाढत चाललेली नकारात्मकता कमी करून सर्वांच्या प्रति जिव्हाळा आपुलकी निर्माण व्हावी यासाठी राबवण्यात आलेल्या जुलै फॉर काइंडनेस या आपुलकी, जिव्हाळा, प्रेमभावना वाढवणाऱ्या अभिनव उपक्रमामुळे समाजात सकारात्मकता वाढीस लागले असल्याचे प्रतिपादन युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ.जयश्रीताई थोरात यांनी केले असून या उपक्रमाला तालुक्यातील नागरिक महिला युवकांसह झेन - झी चा मोठा प्रतिसाद लाभला.

वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुका हा सातत्यपूर्ण विकास कामांबरोबर, सहकार, शिक्षण कृषी ग्रामीण विकास दुग्धविकास, शेती पूरक व्यवसाय, मेडिकल सुविधा, सहिष्णुता, आदरभाव, जिव्हाळा आत्मीयता आणि प्रामाणिकपणा या बाबींसाठी राज्यभरात आदराने ओळखला जातो. ग्रामीण विकासाचे मॉडेल ठरलेल्या संगमनेर तालुक्याने विविध उपक्रम राज्याला दिली असून समाजामध्ये सहिष्णुता व आदरभाव वाढावा याकरता डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून जुलै महिन्यामध्ये जुलै फॉर काइंडनेस हा उपक्रम राबवण्यात आला.

या उपक्रमांतर्गत तालुक्यातील १७१ गावे व २५८ वाड्यावर शालेय विद्यार्थी, युवक नागरिकांनी यामध्ये सहभाग घेतला. सार्वजनिक स्वच्छता, वृक्षारोपण वृक्ष संवर्धन, ज्येष्ठान प्रति आदर, आई - वडिलांना कामात मदत, आजी आजोबांशी गप्पा, इतरांना मदत असे अनेक उपक्रम तालुका भर राबवले गेले. पशुपक्षी यांच्या प्रति जिव्हाळा आणि आत्मीयता वाढली. उपक्रम संपूर्ण महिन्यांमध्ये सर्वत्र राबविण्यात आला.

याचबरोबर महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन जनसंपर्क कार्यालंय मध्यवर्ती ठिकाणी काइंडनेस ट्री बनवण्यात आले आहे. यामध्ये प्रत्येकाने दिवसभर केलेल्या वेगळ्या उपक्रमाचे नोंद करण्यात आली असून ही काइंडनेस ट्री सकारात्मक बाबींच्या विविध उपक्रमांनी बहरली आहे.

# एफडीए तक्रार पोर्टल : अन्न व औषध सुरक्षिततेसाठी नागरिकाभिमुख डिजिटल व्यासपीठ

महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या पुढाकारातून नागरिकांना अन्न व औषधांबाबतच्या तक्रारी सहज, जलद आणि पारदर्शक पद्धतीने नोंदविता याव्यात, त्यांचा मागोवा घेता यावा आणि कार्यवाहीची माहिती वेळेवर मिळावी, या उद्देशाने लोश्रिरळपीी.ारहरषवर.ळप हे डिजिटल तक्रार पोर्टल सुरू करण्यात आले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, मोबाईलद्वारे उपलब्ध सेवा, तक्रार ट्रॅकिंग, अधिकारी डॅशबोर्ड आणि माहितीच्या गोपनीयतेची आधुनिक मानके यांचा समावेश असलेले हे पोर्टल नागरिक आणि प्रशासन यांच्यातील संवाद अधिक परिणामकारक करणारे व्यासपीठ ठरणार आहे.

अन्न व औषधांची गुणवत्ता ही सार्वजनिक आरोग्याशी थेट संबंधित बाब आहे. भेसळयुक्त अन्नपदार्थ, मुदतबाह्य औषधे, निकृष्ट दर्जाची उत्पादने, अस्वच्छ उत्पादन किंवा साठवण व्यवस्था यांसारख्या बाबींविषयी नागरिकांना सक्षम आणि विश्वासार्ह तक्रार निवारण व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या माध्यमातून नागरिक कोणत्याही वेळेस मोबाईल किंवा संगणकाद्वारे तक्रार नोंदवू शकतात, तिची सद्यस्थिती पाहू शकतात आणि संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत माहिती त्वरित पोहोचवू शकतात. हे पोर्टल मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषांमध्ये उपलब्ध आहे. मोबाईल क्रमांकाच्या आधारे नोंदणी करून ओटीपी प्रमाणीकरण पूर्ण केल्यानंतर नागरिक तक्रार नोंदवू शकतात. तक्रार नोंदविताना संबंधित जिल्हा, दुकान, हॉटेल, औषध विक्रेता, उत्पादक किंवा ब्रँडची माहिती तसेच तक्रारीचे स्वरूप नमूद करता येते. 'स्पीच टू टेक्स्ट' सुविधेमुळे बोलूनही माहिती नोंदविण्याची सोय उपलब्ध आहे.

तक्रारीच्या पडताळणीसाठी बिल, छायाचित्रे, उत्पादनाचे तपशील, बॅच क्रमांक किंवा इतर आवश्यक पुरावे जोडता येतात. तक्रार नोंदविताना स्थानाची माहिती देणे अनिवार्य ठेवण्यात आले असून त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करणे सुलभ होते. कार्यक्षेत्राबाहेरील तक्रारी असल्यास संबंधित विभागाबाबत मार्गदर्शन केले जाते, तर अपूर्ण किंवा आवश्यक माहिती नसलेल्या तक्रारी स्वीकारल्या जात नाहीत.




प्रत्येक तक्रारीला स्वतंत्र ट्रॅकिंग क्रमांक दिला जातो. त्याद्वारे तक्रारदाराला आपल्या तक्रारीची सद्यस्थिती, संबंधित अधिकाऱ्यांकडील कार्यवाही आणि अंतिम अहवालाचा मागोवा घेता येतो. यामुळे तक्रार निवारण प्रक्रियेत पारदर्शकता आणि विश्वास वाढण्यास मदत होते. या पोर्टलमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. प्रणाली तक्रारींची तीव्रता, जिल्हानिहाय वितरण, कालावधी आणि प्राधान्यक्रम यांचे विश्लेषण करते. अन्नविषबाधेसारख्या गंभीर तक्रारींना सर्वोच्च प्राधान्य देऊन त्या तातडीने संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठविल्या जातात. तसेच तक्रारीतील माहितीचे विश्लेषण करून तिची विश्वासार्हता तपासली जाते, त्यामुळे प्राथमिक छाननी अधिक परिणामकारकपणे करता येते.

अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र डिजिटल डॅशबोर्ड विकसित करण्यात आला असून प्राप्त तक्रारी, प्रलंबित प्रकरणे, जिल्हानिहाय वर्गीकरण आणि कार्यवाहीचा आढावा एका ठिकाणी उपलब्ध होतो. आयुक्त, सहआयुक्त, प्रादेशिक सहआयुक्त आणि सहाय्यक आयुक्त स्तरावरील अधिकाऱ्यांना त्यांच्या अधिकारक्षेत्रातील माहिती तत्काळ उपलब्ध होत असल्याने देखरेख आणि निर्णय प्रक्रिया अधिक गतिमान होते. अधिकाऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता सहाय्यक सुविधेमुळे कायदेशीर संदर्भ शोधणे, कारणे दाखवा नोटीस तयार करणे, 'स्पीच टू टेक्स्ट'च्या साहाय्याने मसुदे तयार करणे आणि संबंधित कायद्यांतील तरतुदी सहज उपलब्ध होतात. त्यामुळे कार्यवाहीची परिणामकारकता आणि वेग वाढण्यास मदत होते.

प्रणालीमध्ये प्रत्येक अधिकाऱ्याच्या कामकाजाची स्वतंत्र लेखापरीक्षण नोंद ठेवली जाते. कोणत्या अधिकाऱ्याने तक्रार कधी पाहिली, कोणती कार्यवाही केली आणि प्रणालीचा किती वापर केला याची नोंद उपलब्ध असल्याने प्रशासनातील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कार्यक्षमता अधिक बळकट होते. डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षणाच्या तत्त्वांचा विचार करून पोर्टलमध्ये आवश्यक गोपनीयता उपायांचा समावेश करण्यात आला आहे. तक्रारदाराची संमती, माहितीच्या वापराबाबत पारदर्शकता आणि आवश्यकतेनुसार माहिती हटविण्याचा पर्याय यामुळे नागरिकांच्या माहितीचे संरक्षण सुनिश्चित करण्यात आले आहे.

पोर्टलवर नोंदविलेली तक्रार संबंधित प्रादेशिक सहआयुक्तांकडे पोहोचते. कामकाजाच्या २४ तासांच्या आत ती संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तक्रारीच्या स्वरूपानुसार तपासणी, कार्यवाही आणि अहवाल सादर करण्यासाठी निश्चित कालमर्यादा निर्धारित करण्यात आली असून आवश्यकतेनुसार वरिष्ठ स्तरावरून प्रकरणाचे पुनर्वाटप करण्याची सुविधाही उपलब्ध आहे. ही व्यवस्था प्रभावी होण्यासाठी नागरिकांचा जबाबदार सहभाग आवश्यक आहे. तक्रार नोंदवताना संपूर्ण, अचूक आणि सविस्तर माहिती पुराव्यासह देणे अपेक्षित आहे. चुकीची किंवा दिशाभूल करणारी तक्रार केल्यास त्याची नोंद प्रणालीमध्ये राहते. त्यामुळे केवळ वास्तविक आणि सार्वजनिक हिताशी संबंधित तक्रारीच नोंदविणे आवश्यक आहे.

डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, पारदर्शक तक्रार निवारण व्यवस्था आणि उत्तरदायी प्रशासन यांचा समन्वय साधणारे लोश्रिरळपीी.ारहरषवर.ळप हे पोर्टल कालच नागरिकांसाठी सुरू करण्यात आले आहे. नागरिकांना अन्न व औषधांबाबत थेट प्रशासनाशी जोडणारी ही यंत्रणा सार्वजनिक आरोग्य संरक्षण अधिक प्रभावी करण्यासाठी, तक्रार निवारण प्रक्रियेत पारदर्शकता वाढविण्यासाठी आणि नागरिककेंद्रित प्रशासन अधिक सक्षम करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**– जिल्हा माहिती कार्यालय**
**अहिल्यानगर**

# सावधानता आणि जागरूकता हाच सायबर गुन्ह्यांपासून बचावाचा प्रभावी मार्ग – अॅड. राऊत

युवावार्ता (प्रतिनिधी)



संगमनेर - डिजिटल युगात इंटरनेट व समाजमाध्यमांच्या वाढत्या वापरासोबत ऑनलाइन फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर मालपाणी विद्यालयात महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, केंद्र संगमनेर यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी 'सायबर क्राईम' विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

कार्यक्रमाला ड. रोहिणी राऊत, ड. वैशाली राऊत, केंद्रप्रमुख संदीप पवार, मुख्याध्यापक उत्तम एरंडे व पर्यवेक्षिका रंजना पवार उपस्थित होते.

ड. रोहिणी राऊत यांनी सोशल मीडियावरील फसवणूक, बनावट लिंक, ओटीपी व यूपीआय फ्रॉड, ऑनलाइन आर्थिक फसवणूक तसेच बनावट नोकरीच्या जाहिरातींद्वारे होणाऱ्या फसवणुकीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अनोळखी व्यक्तींना आधार, ओटीपी, बँक खात्याची माहिती, पासवर्ड किंवा वैयक्तिक माहिती देऊ नये तसेच संशयास्पद लिंक, फोन, मेसेज व ई-मेलपासून सावध राहण्याचे आवाहन त्यांनी केले. सायबर फसवणूक झाल्यास तातडीने तक्रार कशी करावी व कोणती पावले उचलावीत, याचीही माहिती देण्यात आली. सावधानता आणि जागरूकता हाच सायबर गुन्ह्यांपासून बचावाचा प्रभावी मार्ग आहे, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. विद्यार्थ्यांनीही विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

# संपादकीय...

## पर्यटनाचा वाढता वेग आणि पर्यटकांची जबाबदारी

भारत हा नैसर्गिक सौंदर्य, ऐतिहासिक वारसा, धार्मिक स्थळे आणि सांस्कृतिक विविधतेने समृद्ध देश आहे. महाराष्ट्रालाही सह्याद्रीच्या पर्वतरांगा, समुद्रकिनारे, किल्ले, धबधबे, वनसंपदा आणि धार्मिक स्थळांचे मोठे वरदान लाभले आहे. गेल्या काही वर्षांत पर्यटन क्षेत्रात अभूतपूर्व वाढ झाली आहे. वाहतुकीच्या आधुनिक सुविधा, डिजिटल माध्यमांमुळे वाढलेली माहिती, सामाजिक माध्यमांवरील आकर्षक छायाचित्रे आणि शासनाच्या पर्यटन प्रोत्साहन धोरणांमुळे पर्यटनाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. मात्र, पर्यटनाचा हा वाढता प्रवाह जितका आनंददायी आहे, तितकीच पर्यटकांची जबाबदारीही वाढली आहे. पर्यटन हा केवळ विरंगुळ्याचा किंवा मनोरंजनाचा विषय राहिलेला नाही. तो आज देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारा महत्त्वाचा उद्योग बनला आहे. पर्यटनामुळे स्थानिक रोजगार वाढतो, हस्तकला, हॉटेल व्यवसाय, वाहतूक, शेती आणि लघुउद्योगांना मोठी बाजारपेठ मिळते. ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना पर्यटनामुळे आर्थिक स्थैर्य मिळाले आहे. त्यामुळे पर्यटनाचा विकास हा स्थानिक विकासाशी थेट जोडलेला आहे. परंतु, पर्यटनाच्या वाढत्या गर्दीसोबत अनेक गंभीर समस्या देखील निर्माण होत आहेत. लोकप्रिय पर्यटनस्थळांवर प्लास्टिक कचऱ्याचे ढीग, पाण्याचे प्रदूषण, ध्वनीप्रदूषण, वाहतूक कोंडी आणि पर्यावरणाची हानी ही चिंताजनक बाब बनली आहे. अनेक पर्यटक निसर्गाचा आनंद घेण्याऐवजी त्याच निसर्गाला हानी पोहोचवतात. रिकाम्या पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिक पिशव्या, अन्नाचे अवशेष आणि इतर कचरा जंगलात, डोंगरावर किंवा नदीकाठी टाकण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. यामुळे वन्यजीव, जैवविविधता आणि पर्यावरणावर गंभीर परिणाम होतो. महाराष्ट्रातील अनेक किल्ले, गड, लेणी आणि ऐतिहासिक स्मारकांवर नावे कोरणे, रंग लावणे किंवा भिंतींवर लिहिणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. हजारो वर्षांचा इतिहास जपणाऱ्या वास्तूंचे असे नुकसान करणे म्हणजे आपल्या सांस्कृतिक वारशाचाच अवमान होय. इतिहासाचे जतन करणे ही प्रत्येक नागरिकाची आणि प्रत्येक पर्यटकाची नैतिक जबाबदारी आहे. गेल्या काही वर्षांत साहसी पर्यटनालाही मोठी लोकप्रियता मिळाली आहे. ट्रेकिंग, धबधब्यांमध्ये पोहणे, नदीत उतरून छायाचित्रण करणे किंवा सेल्फी घेण्याच्या नादात अनेक अपघात घडत आहेत. पावसाळ्यात धबधबे, नद्या आणि घाट परिसरात दुर्घटनांची संख्या वाढत असल्याचे चित्र दरवर्षी दिसते. अनेकदा प्रशासनाच्या सूचना दुर्लक्षित करून पर्यटक स्वतःचा आणि इतरांचा जीव धोक्यात घालतात. पर्यटनाचा आनंद घेताना सुरक्षिततेचे नियम पाळणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आज सामाजिक माध्यमांमुळे पर्यटनाला नवे स्वरूप मिळाले आहे. अनेक जण प्रसिद्धी मिळवण्यासाठी धोकादायक ठिकाणी जाऊन व्हिडिओ किंवा छायाचित्रे काढतात. काही वेळा वाहतुकीचे नियम मोडणे, रेल्वे रुळांवर छायाचित्रण करणे किंवा संरक्षित क्षेत्रात प्रवेश करणे अशा प्रकारांमुळे गंभीर अपघात होतात. काही क्षणांच्या प्रसिद्धीसाठी जीव धोक्यात घालणे कधीही योग्य ठरू शकत नाही. पर्यटन करताना स्थानिक संस्कृती, परंपरा आणि लोकांच्या भावनांचा आदर करणेही तेवढेच आवश्यक आहे. धार्मिक स्थळांवर शिस्त पाळणे, स्थानिक रूढींचा सन्मान करणे, ध्वनीप्रदूषण टाळणे आणि स्थानिक लोकांशी सुसंवाद राखणे यामुळे पर्यटन अधिक समृद्ध होते. पर्यटकांनी स्थानिक उत्पादने खरेदी करून आणि स्थानिक सेवांचा वापर करून त्या भागाच्या अर्थव्यवस्थेलाही हातभार लावला पाहिजे. पर्यावरणपूरक पर्यटन ही काळाची गरज बनली आहे. प्लास्टिकचा वापर टाळणे, स्वतःचा कचरा स्वतःच योग्य ठिकाणी टाकणे, पाण्याची व विजेची बचत करणे, झाडे-झुडपे किंवा वन्यजीवांना त्रास न देणे आणि निसर्ग जसा आहे तसाच जपणे, या साध्या सवयी प्रत्येक पर्यटकाने अंगीकारल्या तर पर्यटनाचा आनंदही टिकेल आणि पर्यावरणाचे संरक्षणही होईल. पर्यटनाचा विकास हा स्वागतार्ह असला, तरी त्यासोबत जबाबदारीची जाणीव असणे अधिक महत्त्वाचे आहे. पर्यटनस्थळे ही केवळ आजच्या पिढीसाठी नसून भावी पिढ्यांचीही अमूल्य संपत्ती आहेत. त्यांचे संरक्षण करणे हे शासन, स्थानिक प्रशासन आणि नागरिक यांच्याइतकेच प्रत्येक पर्यटकाचेही कर्तव्य आहे. पर्यटन म्हणजे केवळ प्रवास नव्हे, तर निसर्ग, इतिहास आणि संस्कृतीचा सन्मान करण्याची संधी आहे. जबाबदार पर्यटकच शाश्वत पर्यटनाचा पाया मजबूत करू शकतात. स्वच्छ पर्यटन, सुरक्षित पर्यटन आणि जबाबदार पर्यटन हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.

SUBSCRIBE
DAINIK YUVAVARTA
YOUTUBE CHANNEL
Daily Yuvavarta दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

## श्री ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालयात 'युवान' मोहिमेचे पोस्टर अनावरण, नोंदणी कार्यक्रम



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या परिपत्रकानुसार, तरुणांमधील ऊर्जा आणि सर्जनशीलतेला राष्ट्र निर्माणाच्या कार्यात जोडण्याच्या उद्देशाने राबवल्या जाणाऱ्या 'युवान' (Youth Organized United with Vision and Action for Nation Building) या विशेष मोहिमेअंतर्गत श्री ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालय, संगमनेर येथे विद्यार्थी नोंदणी अभियानाचे आयोजन करण्यात आले.

या प्रसंगी डॉ. प्रतिक शिंदे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना 'युवान' मोहिमेची पार्श्वभूमी, तिचे स्वरूप आणि त्यामागील उद्देश याबद्दल सविस्तर माहिती दिली. समाज आणि देशासाठी सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी तरुणांनी प्रत्यक्ष कृतीत उतरावे, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे समन्वयक तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. नागराज खराडे यांनी उपक्रमाविषयी सविस्तर मार्गदर्शन करत इच्छुक विद्यार्थ्यांची 'युवान' मोहिमेअंतर्गत यशस्वीरीत्या नोंदणी करून घेतली. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. राहुल देशमुख यांनी विद्यार्थ्यांना या राष्ट्रोपयोगी उपक्रमात उस्फूर्तपणे सहभागी होण्याचे आणि आपल्या आवडीच्या क्षेत्रात सकारात्मक योगदान देण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमास प्रा. डॉ. कपिल चौरपगार, देवयानी निकम, डॉ. सचिन पठारे, प्रा. रामदास सोन्नर, प्रा. बालाजी नरवटे, प्रा. सृष्टी देशमुख, कार्यालयीन अधीक्षक सचिन वालझाडे यांच्यासह महाविद्यालयातील इतर प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## जागतिक हिपॅटायटिस दिनानिमित्त श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूटतर्फे गावात जनजागृती अभियान

युवावार्ता (प्रतिनिधी)

माळवाडी (बोटा): जागतिक हिपॅटायटिस दिनानिमित्त श्री स्वामी समर्थ इन्स्टिटयूट, माळवाडी (बोटा) यांच्या फार्मसी विभागातर्फे बोटा गाव तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र बोटा येथे हिपॅटायटिसविषयी जनजागृती अभियान उत्साहात राबविण्यात आले.

या अभियानादरम्यान विद्यार्थ्यांनी नागरिक, रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना हिपॅटायटिसचे प्रकार, संसर्गाची कारणे, लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, वेळेवर निदान, लसीकरणाचे महत्त्व तसेच वैयक्तिक स्वच्छता व सुरक्षित आरोग्यदायी सवयींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यकृताच्या आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करत हिपॅटायटिसविषयीचे गैरसमज दूर करण्यासाठी माहितीपत्रकांचे वाटप करून नागरिकांशी संवाद साधण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य कर्मचाऱ्यांशी संवाद साधून हिपॅटायटिस प्रतिबंधासाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्य उपक्रमांची माहिती जाणून घेतली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सामाजिक आरोग्य जनजागृतीचे प्रत्यक्ष अनुभव मिळाले. याप्रसंगी संस्थेचे सचिव डॉ. अमित पोखरकर यांनी, फार्मसी विद्यार्थ्यांनी समाजात आरोग्यविषयक जनजागृती निर्माण करून प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेत सक्रिय योगदान देणे ही आजच्या काळाची गरज आहे, असे प्रतिपादन केले.

या उपक्रमात प्राचार्य सागर सांगळे, प्रा. स्वप्नील वरे, प्रा. स्नेहा फंड, प्रा. निशा वरे, प्रा. मंगल शेळके व प्रा. ज्योत्स्ना शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या अभियानाचे ग्रामस्थ, रुग्ण व आरोग्य कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.



## स्ट्रॉबेरी स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी मातृ-पितृ पूजन करून साजरी केली गुरुपौर्णिमा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - स्ट्रॉबेरी इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा आणि मातृ-पितृ पूजन सोहळा मोठ्या उत्साहात व भावुक वातावरणात साजरा करण्यात आला. गुरुपौर्णिमा हा सण गुरु आणि शिष्यांच्या पवित्र नात्याचे प्रतीक आहे. दरवर्षी स्ट्रॉबेरी शाळेमध्ये गुरुपौर्णिमा ही मातृ-पितृ पूजन करून, जीवनातील प्रथम गुरूंच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी साजरी केली जाते. गतवर्षीप्रमाणे याही वर्षी हा उत्सव अत्यंत उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. या प्रसंगी संस्थेच्या संस्थापिका डॉ. सौ. संज्योत वैद्य, शाळेचे शिक्षक आणि मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी आपल्या माता-पित्यांचे पाद्यपूजन करून, उत्तम यश संपादन करून गुरुदक्षिणारूपी इच्छा पूर्ण करण्याचे अभिवचन दिले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थापिका डॉ. सौ. संज्योत वैद्य म्हणाल्या की, गुरु, आई-वडील, शिक्षक आणि समाज या सर्वांचा आपल्या घडणीत मोठा वाटा असतो. आयुष्यात मागे वळून बघताना आपल्या जीवनाला खरा आकार देण्याचे काम कोणी केले असेल, तर ते म्हणजे आपले आई-वडील! त्यामुळे आई-वडिलांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे.

याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना पालक श्री. आकाश राठी म्हणाले की, असा भावुक क्षण आम्ही आयुष्यात पहिल्यांदाच अनुभवत आहोत. असे उत्सव मुलांच्या मनावर उत्तम संस्कार घडवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत आणि यापुढेही ते असेच साजरे करण्यात यावेत. तसेच पालक सोनाली उपरे बोलताना म्हणाल्या की, मुलं म्हणजे ईश्वराची एक अनमोल भेट आहेत. शाळेने या अत्यंत संस्कारदायी कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी शाळेचे मनापासून आभार व्यक्त केले. उपस्थित सर्वांनाच एक भावनिक आणि आध्यात्मिक अनुभव देणारा हा सोहळा ठरला.

## पान १ वरून आ. अमोल...

पान १ वरून

या प्रकरणी सहा महिन्यांत यावर निकाल येणं अपेक्षित असल्याचे त्यांनी म्हटले. नीलकमल भागीदारी संस्था आहे. त्याचा प्रोफेशनल टॅक्स भरला नव्हता. ५४ हजारांची थकबाकी बाकी आहे, ही माहिती खातल यांनी लपविली असल्याचे त्यांनी म्हटले. संगमनेर मतदारसंघात झालेल्या विधानसभा निवडणुकीत अमोल खताळ यांनी बाळासाहेब थोरात यांचा पराभव केला होता. चार दशकांहून अधिक काळ या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या थोरात यांना सुमारे १० हजार मतांनी पराभव स्वीकारावा लागला होता. खताळ यांना १,११,४९५ मते मिळाली, तर थोरात यांना ९९,६४३ मते मिळाली होती.

**CHANGE IN NAME**

My previous name was Bismilla Aabubhai Shaikh, and from now on, it has been changed to Bismillahbi Aabubhai Shaikh.

Affidavit Numbers: 26522, 42031, 268100, 639934
Date: 29/07/2026

**पाहिजेत**
क्षितिज इलेक्ट्रीकल
घुलेवाडी, ता. संगमनेर
अनुभवी अकाऊंटट पाहिजे - २ जागा
(पुर्णवेळ)
MS Offics Tally
ज्ञान आवश्यक
- संपर्क -
7007608875

**पाहिजेत**
मोरया टॉइज व गिफ्ट शॉप
दुकान कामासाठी
होतकरु कामगार पाहिजे
शिक्षण- किमान १० वी
पत्ता- पोफळे मळा, अभंग पेट्रोल पंप समोर
9767880009

## आता छत्रपती शिवाजी महाराज कोयना जलसागर

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - पश्चिम महाराष्ट्राला वरदान ठरलेल्या कोयना जलसागराचे छत्रपती शिवाजी महाराज कोयना जलसागर असे नामांतर करण्याचा महत्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने घेतला असल्याची माहीती जलसंपदा मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. कोयना जलसागरास यापुर्वी शिवाजी जलसागर या नावाने संबोधले जात होते.मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख योग्य नसल्याने नावामध्ये बदल करून छत्रपती शिवाजी महाराजांचे पूर्ण नाव कोयना जलशायला द्यावे आशी मागणी होत होती. जलसंपदा मंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांनी याबाबत पुढाकार घेवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जलशयाचे नामांतर करण्याबाबत विनंती केली होती. महायुती सरकारने याबाबतचा शासन आदेश जारी करून कोयना जलसागरास नाव छत्रपती शिवाजी महाराज कोयना जलसागर असे करण्याचा महत्वपूर्ण निर्णय जाहीर केल्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे यांनी सांगितले.

जलसागराचे नामांतर करण्याची शिवप्रेमी नागरीकांची मागणी आणी जलसंपदा विभागाच्या प्रस्तावाचा सकारात्मक विचार करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या निर्णयाबद्दल मंत्री विखे पाटील यांनी आभार मानले.

**ANTARBHARTI RURAL INTERNATIONAL MEDICAL EDUCATION TRUST'S**
**ANANDGAD POLYTECHNIC COLLEGE**
Virgaon,Tal- Akole, Dist-Ahilyanagar 422601
Affilated To MSBTE ,Mumbai
Mobile No:- 9503209505, 9404696305 Website:- https://arimetvirgaon.com/

**ADMISSION NOTIFICATION 2026-2027**
(DTE Code-5662)

Application are invited from eligible candidates to First Year and Direct Second Year Diploma against CAP Quota, Vacant seats and Institute level for

1) Artificial Intelligence and Machine Learning
2) Civil Engineering
3) Computer Engineering
4) Mechanical Engineering
5) Electrical and Electronics Engineering

**Eligibility:** As per D.T.E. and Government of Maharashtra rules.

**ADMISSION SCHEDULE 2026-2027**
**(Against CAP and Institute Level)**

| Sr. No. | Particular | First Year Schedule | Direct Second Year Schedule |
|---|---|---|---|
| 1. | Invitation of Application for Institutional Quota and Vacant seat after CAP | 29/07/2026 to 07/08/2026 | 29/07/2026 to 09/08/2026 |
| 2. | Display of Provisional Merit List | 08/08/2026 | 10/08/2026 |
| 3. | Grievances on Merit List if any | 09/08/2026 | 10/08/2026 at 5.00 P.M. |
| 4. | Display of final Merit List | 10/08/2026 | 11/08/2026 |
| 5. | Confirmation of Admission by submitting required documents | 11/08/2026 to 14/08/2026 | 11/08/2026 to 14/08/2026 |

For changes in above schedule (if any) kindly visit college web site time to time
Principal

**पाहिजेत**
कापड दुकानासाठी
सेल्समन- २ जागा (पुरूष)
कॉम्प्युटर ऑपरेटर - १ जागा
(कामाची वेळ सकाळी १० ते रात्री १०/ पार्ट टाईम)
(अनुभवास प्राधान्य व आकर्षक पगार)
मेन्स स्टुडिओ
नाशिक-पुणे हायवे लॉ कॉलेज समोर, संगमनेर
8830437076
9822882399

**पाहिजेत**
दुकान कामासाठी
होतकरू मुले पाहिजेत.
हेल्पर / शिलाई कामगार
महिला - पुरूष
आकर्षक पगार दिला जाईल
अमोल कुशन्स
मार्केट यार्ड, संगमनेर
8805647610
8788483245

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम,
स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
- संपर्क -
8788945208
8208223721

**पाहिजेत**
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट - १ (महिला)
वेळ - सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
8080548282
7498749500

**पाहिजेत**
पेट्रोल पंप वर 2 कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी कृपया संपर्क करावा.
चैतन्य पेट्रोलियम
संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी, ता. संगमनेर
- संपर्क -
8888808397







**फॅकल्टी पाहिजे**
अगस्ती अकॅडमी संगमनेर
ऑनलाईन / ऑफलाईन अभ्यासक्रम
पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.
AMVI - 461 जागा MPSC (सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.
सरळसेवा बॅच २०२६ लवकरच सुरू
MPSC राज्यसेवा | गट B गट C | पोलिस भरती | बँकींग परिक्षा | सर्व स्पर्धा परिक्षा
अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवर्ग
सविस्तर मार्गदर्शन
नियमित टेस्ट, PYQ सराव व चर्चा
LIVE + Recorded बॅच सुविधा
वैयक्तिक मार्गदर्शन व शंका निरसन
पत्ता : नाशिक - पुणे हायवे, संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र बँकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५
6005401510
9209645727

# नेतृत्वाचा आणि कर्तृत्वाचा महामेरू!

## लोकाभिमुख, सृजनशील आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व : मधुकरराव नवले (भाऊ)

अहमदनगर जिल्ह्यातील अगस्ती ऋषींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या, खळखळ वाहणाऱ्या प्रवरा माईच्या कुशीत वसलेल्या ऐतिहासिक अकोले तालुक्यात राजकारण, समाजकारण आणि विविध चळवळींचा समृद्ध वारसा लाभलेल्या नवलेवाडी या गावात लोकाभिमुख, सृजनशील आणि लोकप्रिय नेतृत्व म्हणून मा. मधुकरराव नवले तथा भाऊ यांचा उदय झाला. नवलेवाडी हे स्वातंत्र्यसैनिकांचे गाव म्हणून ओळखले जाते. या गावातील अनेकांनी स्वातंत्र्य संग्रामात योगदान दिले. सन १९४५ मध्ये कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली शेतकरी बांधवांना संघटित करणारी पहिली किसान सभा याच गावात स्वातंत्र्यसैनिक कॉम्रेड बुवासाहेब नवले यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झाली. अशा प्रेरणादायी वातावरणात मधुकरराव नवले यांची जडणघडण झाली.

मा. मधुकरराव नवले यांचा जन्म २१ मे १९५३ रोजी श्री. लक्ष्मण दगडू नवले आणि सौ. राधाबाई नवले यांच्या शेतकरी कुटुंबात झाला. घरातील शिस्त, सामाजिक विचार आणि संस्कार यांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर मोठा प्रभाव पडला. १९७० मध्ये एस.एस.सी. उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी उच्च शिक्षणाऐवजी शेतीकडे वळत आदर्श शेतकरी म्हणून काम केले. शेती करत असतानाच त्यांनी गावातील विविध मंडळांची स्थापना, सामाजिक समस्या सोडविणे, समाजप्रबोधनपर उपक्रम राबविणे आणि सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेण्यास सुरुवात केली. त्यांच्या कार्यातील नेतृत्वगुण ओळखून स्वातंत्र्यसैनिक कॉम्रेड बुवासाहेब नवले यांनी त्यांना प्रेरणा दिली. सन १९७८ पासून मधुकरराव नवले तथा भाऊ यांनी साम्यवादी चळवळ, राजकारण आणि समाजकारणात सक्रिय सहभाग घेतला. याच वर्षी त्यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. अकोले तालुका कम्युनिस्ट पक्षाच्या सचिवपदी तसेच अहमदनगर जिल्ह्याच्या सहसचिवपदी त्यांची निवड झाली. पक्षाच्या राज्य कौन्सिलचे सदस्य म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली.

शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी अकोले, संगमनेर आणि अहमदनगर जिल्ह्यात झालेल्या विविध आंदोलनांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. प्रवरा नदीच्या पाण्याच्या फेरवाटपाच्या ऐतिहासिक आंदोलनात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. स्वर्गीय भाऊसाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली उपसा जलसिंचन योजनांच्या सामाजिक अभियानात सहभागी होत नवलेवाडी गावातून सुमारे २५० एकर क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या या कार्याची दखल घेत जनतेने त्यांना मोठा पाठिंबा दिला. अकोले ग्रामपंचायतीच्या नवलेवाडी व धुमाळवाडी विभागातून नागरिकांनी त्यांना सलग दोन वेळा बिनविरोध निवडून दिले. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून त्यांनी अनेक समाजोपयोगी कामे केली.



सन १९८२ मध्ये ऑल इंडिया युथ फेडरेशनच्या नेतृत्वाखालील चळवळीचे त्यांनी नेतृत्व केले. त्याच काळात अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या व्यवस्थापन मंडळावर त्यांची नियुक्ती झाली. अकोले तालुका बहुउद्देशीय सेवा सोसायटीचे संचालक तसेच अकोले तालुका खरेदी-विक्री संघाचे संचालक म्हणूनही त्यांनी काम केले.

सन १९८३ मध्ये अगस्ती उपसा जलसिंचन संस्थेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांनी स्वीकारली. पुढे अगस्ती सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीतही त्यांचे योगदान राहिले. सन १९८९ मध्ये संगमनेर भाग सहकारी साखर कारखान्याच्या संचालकपदी त्यांची निवड झाली व सलग पाच वेळा त्यांनी ही जबाबदारी सांभाळली.

**शिक्षण क्षेत्रातील क्रांतीचे शिल्पकार**

**अभिनव शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांना दिली गुणवत्तेची दिशा -**

मा. मधुकरराव नवले तथा भाऊ यांचे कार्य केवळ राजकारण आणि समाजकारणापुरते मर्यादित राहिले नाही, तर त्यांनी शिक्षण क्षेत्रातही दूरदृष्टीपूर्ण काम केले. अकोले तालुक्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार इंग्रजी शिक्षणाची सुविधा मिळावी, या सामाजिक जाणिवेतून त्यांनी सन १९९२ मध्ये अभिनव शिक्षण संस्थेची स्थापना केली आणि अभिनव पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेची सुरुवात केली. त्या काळात ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची सुविधा अत्यंत मर्यादित होती. शिक्षण क्षेत्रातील बदलती गरज ओळखून भाऊंनी काळाची पावले ओळखली आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे दालन खुले केले.

अभिनव शिक्षण संस्थेचा प्रवास हा संघर्षमय होता. पालकांकडून मिळणारी अत्यल्प फी, शैक्षणिक सुविधांची कमतरता, आर्थिक अडचणी आणि तज्ज्ञ शिक्षकांचा अभाव अशा अनेक संकटांना सामोरे जात भाऊंनी संस्थेची यशस्वी वाटचाल सुरू ठेवली.

आज अभिनव शिक्षण संस्था ही अकोले तालुक्याच्या शैक्षणिक विकासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरली आहे. संस्थेतून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रात कार्यरत आहेत.

**शिक्षणाचा विस्तार आणि नव्या संधींची निर्मिती**

विद्यार्थ्यांना केवळ पारंपरिक शिक्षण न देता त्यांना रोजगाराभिमुख आणि व्यावसायिक शिक्षण मिळावे, या उद्देशाने भाऊंनी अभिनव शिक्षण संस्थेच्या माध्यमातून विविध शाखांची निर्मिती केली. संस्थेअंतर्गत बी.एड. कॉलेज, डी.टी.एड. कॉलेज, एम.बी.ए. कॉलेज, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, सिनिअर कॉलेज ऑफ सायन्स यांसारख्या शैक्षणिक संस्था सुरू करण्यात आल्या.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सीबीएसई अभ्यासक्रमाचे दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी वसुंधरा अकॅडमी, तसेच कोतूळ येथे मुळा व्हॅली इंग्लिश मीडियम स्कूल आणि राजूर येथे सह्याद्री व्हॅली इंग्लिश मीडियम स्कूल सुरू करण्यात आल्या.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरातील शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे भाऊंचे स्वप्न या माध्यमातून साकार झाले.

**सामाजिक बांधिलकी आणि नेतृत्वाची वेगळी ओळख**

मधुकरराव नवले यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे नेतृत्व, शिस्त आणि माणुसकीचा सुंदर संगम आहे. त्यांनी विविध संस्थांमध्ये काम करताना प्रत्येक सहकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी कुटुंबातील सदस्याप्रमाणे जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले. कामाच्या बाबतीत कठोर शिस्त आणि निर्णयक्षम नेतृत्व ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. सर्वांना सोबत घेऊन जाण्याची संघटन क्षमता आणि माणसे जोडण्याचे कौशल्य यामुळे त्यांनी अनेक संस्था यशस्वीपणे उभ्या केल्या. त्यांचे प्रभावी वक्तृत्व, विषयाचा सखोल अभ्यास आणि समाजहिताची तळमळ यामुळे ते एक प्रभावी वक्ते आणि समाजमनावर छाप पाडणारे नेतृत्व म्हणून ओळखले जातात.

**विविध पुरस्कारांनी कार्याचा गौरव**

मा. मधुकरराव नवले यांच्या कार्याची दखल घेत विविध संस्था आणि संघटनांनी त्यांचा गौरव केला आहे. अभिनव शिक्षण संस्थेला त्यांच्या नेतृत्वाखाली 'बेस्ट मॅनेजमेंट' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच त्यांना 'अकोले कार्यगौरव २०१०-२०११' पुरस्कार, 'लोकनेते' पुरस्कार, 'शिवपुत्र महाराष्ट्र गौरव पुरस्कार', तसेच 'सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार' अशा अनेक सन्मानांनी गौरविण्यात आले. हे पुरस्कार त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सार्वजनिक जीवनातील उल्लेखनीय योगदानाची पावती आहेत.

**समाजाच्या हृदयातील 'भाऊ'**

अकोले तालुक्यातील अनेक संस्थांच्या उभारणीत आणि विकासात मधुकरराव नवले यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांच्यासोबत काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची आपुलकीने चौकशी करणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि मदतीचा हात देणे ही त्यांच्या स्वभावाची वैशिष्ट्ये आहेत. भाऊ म्हणजे केवळ एक नेता नाही, तर प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होणारे आपलेपणाचे व्यक्तिमत्त्व आहे. माणसे जोडण्याची ताकद, समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द आणि स्वच्छ चारित्र्य यामुळे त्यांनी जनमानसात आदराचे स्थान निर्माण केले आहे. एक यशस्वी नेता, उत्तम संघटक, प्रभावी वक्ता, शिस्तप्रिय प्रशासक, प्रेमळ माणूस आणि समाजहितासाठी सदैव कार्यरत असलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे आदरणीय मधुकरराव नवले तथा भाऊ.

**शब्दांकन : डॉ. जयश्री देशमुख**
**कॅम्पस डायरेक्टर, अभिनव शिक्षण संस्था, अकोले**

# संगमनेरमध्ये उद्योजकांसाठी विशेष कार्यशाळा

## ऑनलाइन मार्केटिंगद्वारे व्यवसायवृद्धीच्या संधी



युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर-सध्याच्या स्पर्धात्मक युगात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्रातील उद्योजकांना आपल्या उत्पादनांचे ब्रँडिंग, मार्केटिंग आणि डिजिटल माध्यमातून व्यवसाय विस्तारासाठी सक्षम करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारच्या राष्ट्रीय लघु उद्योग निगम लिमिटेड (एनएसआयसी) आणि ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स (ओएनडीसी) यांच्या संयुक्त विद्यमाने संगमनेर येथे विशेष शासकीय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. 'एमएसएमई ट्रेड इनेबलमेंट अँड मार्केटिंग' उपक्रमांतर्गत मालपाणी लॉन्सच्या ऑडिटोरियममध्ये गुरुवार, दि. ३० जुलै रोजी हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यशाळेचे आयोजन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, व्हिझडम एक्स्ट्रा प्रा. लि., रोटरी क्लब ऑफ संगमनेर, स्वयंशक्ती स्त्री उद्यमी फाउंडेशन आणि चेनलियर यांच्या सहकार्याने करण्यात आले. कार्यक्रमात उद्योजकांना शासनाच्या विविध योजना, डिजिटल मार्केटिंग, ऑनलाइन व्यवसाय विस्तार आणि ओएनडीसीच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी एनएसआयसीचे व्यवस्थापक अनिल सोनी यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे स्वागत केले. जिल्हा उद्योग केंद्राचे इंडस्ट्री ऑफिसर अशोक बेनके यांनी शासनाच्या योजनांविषयी जागरूक राहून त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. श्री. बोरसे यांनी जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजनांची माहिती दिली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे राज्य समन्वयक वेदांशू पाटील यांनी उद्योग क्षेत्रात टिकून राहण्यासाठी काळानुसार स्वतःमध्ये सातत्याने बदल करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारिणी सदस्य सुधीर डागा यांनी तालुकास्तरावर अशा उपयुक्त शासकीय कार्यशाळेचे आयोजन झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

रोटरी क्लब ऑफ संगमनेरचे अध्यक्ष समीर शहा यांनी उद्योजकांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून उद्योगवाढीसाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे, असे सांगितले. स्वयंशक्ती स्त्री उद्यमी फाउंडेशनच्या उपाध्यक्षा स्वाती शहा यांनी संगमनेरसह परिसरातील उद्योजकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाचे कौतुक केले. व्हिझडम एक्स्ट्रा प्रा. लि.च्या संचालिका दिपाली चांडक यांनी सूक्ष्म व लघुउद्योगांसाठी असलेल्या विविध शासकीय धोरणांची माहिती देत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांमध्ये विनामूल्य सहभाग, ट्रेडमार्क, बारकोड, शासकीय अनुदाने आदी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. चेनलियरचे प्रजापती यांनी ओएनडीसीद्वारे उपलब्ध होणाऱ्या 'बिझनेस टू कंझ्युमर (B2C)' आणि 'बिझनेस टू बिझनेस (B2B)' संधी, तसेच आकर्षक पॅकेजिंगसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन याबाबत माहिती दिली. पोटपाणी क्लबचे प्रकल्प संचालक आनंद हासे यांनी आधुनिक पॅकेजिंग तंत्रज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यशाळेस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, अन्न तंत्रज्ञान व्यवस्थापक अमोल ढाकणे आणि पीएमएफएमईचे क्षेत्रीय अधिकारी राजेश अंभोरे यांचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एमएसएमई डेस्कच्या वरिष्ठ व्यवस्थापक गौरी बैरागी यांनी केले. या कार्यशाळेला महाराष्ट्र चेंबरचे श्रीनिवास भंडारी, प्रकाश कलंत्री, गोरख कुटे, रोटरी क्लबचे सचिव संकेत काजळे, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा सौ. चोपडे यांच्यासह राज्यभरातील १०० हून अधिक उत्पादन व सेवा क्षेत्रातील उद्योजकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून शासकीय योजनांची माहिती घेतली. या कार्यशाळेत एमएसएमई टीम योजनेअंतर्गत उद्योजकांना शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर पूर्णपणे मोफत नोंदणी, डिजिटल बाजारपेठेत प्रवेश आणि ऑनलाइन मार्केटिंगद्वारे व्यवसायवृद्धीच्या विविध संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थित उद्योजकांनी या उपक्रमाचे स्वागत करत अशा कार्यशाळा नियमितपणे आयोजित करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# प्रकाश जोशी यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथील माहेश्वरी समाजातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रकाश जयनारायण जोशी यांचे गुरुवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

संगमनेर नगरपरिषदेच्या नगरसेविका प्रियांका श्रीपाल शहा यांचे ते वडील होते.गुरुवारी सायंकाळी त्यांच्यावर येथील अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै प्रकाश जोशी यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# साहित्य संमेलनासाठी पाच कोटी

पुणे (वृत्तसंस्था) शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी पाच कोटी रुपये आणि या सम्मेलनाच्या निमित्ताने होणारी नांदी संमेलने व विविध उपक्रमांसाठी साडेबारा कोटी रुपये, अशा एकूण १७ कोटी ५० लाखांच्या निधीची घोषणा राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केली. संमेलनाच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेत (मसाप) आयोजित आढावा बैठकीनंतर झालेल्या कार्यक्रमात सामंत बोलत होते. राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागातर्फे साहित्य संमेलनासाठी दरवर्षी दोन कोटी रुपयांचा निधी दिला जातो. यंदा शंभरावे साहित्य संमेलन असल्याने तीन कोटी रुपये वाढवून पाच कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. या संमेलनानिमित्त होणाऱ्या ९९ नांदी साहित्य संमेलनांसाठी पाच कोटी रुपये, १३ विद्यार्थी साहित्य संमेलनांसाठी चार कोटी रुपये, परदेशात होणाऱ्या १२ संमेलनांसाठी 'सीएसआर'च्या माध्यमातून दोन कोटी रुपये, मसापला एक कोटी रुपये आणि पुस्तकांच्या दालनांसाठी ५० लाख, असा एकूण १७ कोटी ५० लाखांचा निधी मराठी भाषा विभाग देणार असल्याचे सामंत यांनी जाहीर केले.

# गजबजलेल्या परिसरात विजेच्या खांबावर करंट

## खालून धूर निघाल्याने नागरिकांमध्ये घबराट



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील नाशिक-पुणे महामार्गावरील राजेंद्र होंडा शोरूमजवळ असलेल्या एका विजेच्या लोखंडी खांबावर वीजप्रवाह उतरल्याची धक्कादायक घटना शनिवारी समोर आली. खांबाच्या तळभागातून अचानक धूर निघू लागल्याने परिसरातील नागरिक, व्यावसायिक तसेच महामार्गावरून ये-जा करणाऱ्या प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटना घडलेले ठिकाण हे शहरातील अत्यंत गजबजलेले व व्यावसायिक केंद्र असून येथे दिवसभर मोठ्या प्रमाणावर वाहनांची आणि नागरिकांची वर्दळ असते. अशा ठिकाणी विजेचा प्रवाह लोखंडी खांबावर उतरल्याने मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. स्थानिक नागरिकांनी तत्काळ संबंधित वीज वितरण विभागाला घटनेची माहिती दिली असून, परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. वीज विभागाने त्वरित घटनास्थळी दाखल होऊन तांत्रिक बिघाड दूर करावा, तसेच अशा धोकादायक खांबांची तपासणी करून संभाव्य अपघात टाळावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, संबंधित परिसरात नागरिकांनी व वाहनचालकांनी सावधगिरी बाळगावी आणि वीजेच्या खांबापासून सुरक्षित अंतर ठेवावे, असे आवाहनही करण्यात येत आहे.

# थोरात कारखान्याकडून चंदनापुरी घाटात वृक्षारोपण

युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर - थोर स्वातंत्र्यसेनानी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी भावी पिढ्या व हरितसृष्टीच्या संवर्धनासाठी दंडकारण्य अभियान सुरू केले. या अभियानामुळे तालुक्यासह राज्यांमध्ये वृक्षरोपण व संवर्धन वाढीची मोठी लोक चळवळ निर्माण झाली असल्याचे प्रतिपादन दंडकारण्य अभियानाचे मुख्य प्रवर्तक माजी आमदार डॉ सुधीर तांबे यांनी केले आहे .थोरात कारखान्याच्या वतीने रिमझिम पावसामध्ये चंदनापुरी घाटामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.



चंदनापुरी घाट येथे सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले यावेळी ते बोलत होते या प्रसंगी प्रकल्प प्रमुख सौ दुर्गाताई तांबे ,कारखान्याचे व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले, हौशीराम सोनवणे ,संचालक विनोद हासे, विजय राहणे, गुलाबराव कडलग,विलास शिंदे,रामनाथ कुटे ,सतीश वर्पे, दिलीप नागरे, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, आदिवासी सेवक प्रा. बाबा खरात, जनरल सेक्रेटरी किरण कानवडे ,कार्यालय अधीक्षक कृष्णा दिघे, यांच्यासह कारखान्याचे सर्व विभाग प्रमुख अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी चंदनापुरी घाटामध्ये भर पावसात कारखान्याच्या कर्मचारी व कार्यकर्त्यांनी पावसाची गाणी गात, रिमझिम पावसात भिजत, आनंदाने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले.

यावेळी बोलताना माजी आमदार डॉ सुधीर तांबे म्हणाले की, स्वतःच्या शरीराच्या काळजीप्रमाणे सृष्टीच्या शरीराची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. आणि यासाठी पर्यावरण संवर्धन या अत्यंत महत्त्वाचे आहे. निसर्गाने माणसाला भरभरून दिले आता माणसाने निसर्गाला दिले पाहिजे. ग्लोबल वॉर्मिंगच्या समस्येमुळे दुष्काळ ,अतिवृष्टी सारखे संकटे निर्माण होतात. प्रदूषण ही सध्या मोठी समस्या निर्माण झाली असून यावर मात करण्यासाठी प्रत्येकाने ऑक्सिजन देणारे वृक्ष रोपण व संवर्धन केलेच पाहिजे. ऑक्सीजन चे महत्व सहा वर्षांपूर्वी जगाला कळाले आहे मात्र कोरोना गेला आणि लोक त्या परिस्थितीला विसरले. मात्र आपल्याला सजीव सृष्टीच्या रक्षणाकरता पर्यावरण सृष्टीचे संवर्धन केलेच पाहिजे असे ते म्हणाले.

**पाईल्सचा कायमचा उपाय !**
**वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?**
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



SALE 25 TO 50 % OFF
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी
क्लॉथ सेंटर सिल्क ॲण्ड सारीज
मनासारखी खरेदी आणि भरपुर फायदा देणारा सेल
(संपूर्ण ए.सी. शोरुम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

# प्रवरा नदीच्या पुरात पोहायला गेलेला तरुण बेपत्ता

## दुसऱ्या दिवशीही शोधमोहीम सुरू



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भंडारदरा पाणलोट क्षेत्रासह लाभक्षेत्रात गेल्या पंधरवड्यापासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे प्रवरा नदी दुथडी भरून वाहत आहे. हजारो क्युसेक्स वेगाने वाहणाऱ्या पुराच्या पाण्यात उतरू नये, असा प्रशासनाचा वारंवार इशारा असतानाही काहीजण जीव धोक्यात घालून नदीत पोहण्यासाठी उतरत असल्याचे चित्र दिसत आहे. अशाच निष्काळजीपणातून गुरुवारी (३० जुलै) दुपारी संगमनेर येथील गंगामाई घाटावर पोहण्यासाठी उतरलेला पारेगाव गडाख येथील ऋषिकेश नवनाथ गडाख हा तरुण पुराच्या पाण्यात बेपत्ता झाला. शुक्रवारी दुपारपर्यंत विविध यंत्रणांकडून शोधमोहीम राबवूनही त्याचा अद्याप शोध लागलेला नसून शोधकार्य सुरूच आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ऋषिकेश गडाख हा आपल्या मित्रांसह गंगामाई घाटावर पोहण्यासाठी गेला होता. भंडारदरा आणि निळवंडे ही दोन्ही धरणे तुडुंब भरून वाहत असल्याने प्रवरा नदीला मोठा पूर आला आहे. नदीच्या पाण्याची पातळी सातत्याने वाढत असतानाही अनेकजण पुराचे पाणी पाहण्यासाठी आणि काहीजण पोहण्यासाठी नदीकाठावर गर्दी करत होते.

याचवेळी ऋषिकेश पोहण्यासाठी नदीत उतरला. काही अंतर पोहून तो खोल पाण्यात गेल्यानंतर बराच वेळ बाहेर न आल्याने तो बुडाल्याची भीती व्यक्त करण्यात आली. क्षणातच घटनास्थळी एकच धावपळ उडाली. काहींनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, तर काहीजण मोबाईलवर या घटनेचे चित्रीकरण करण्यात गुंतले. मात्र, ऋषिकेश पुराच्या पाण्यात नजरेआड झाला.

घटनेची माहिती मिळताच संगमनेर नगरपालिकेला कळविण्यात आली. तसेच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनाही माहिती देण्यात आली. त्यांनी तातडीने थोरात साखर कारखान्याची यंत्रणा घटनास्थळी पाठविण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार दुर्गा तांबे, डॉ. जयश्री थोरात, नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांच्यासह कारखान्याची व नगरपालिकेची यंत्रणा मदतीसाठी घटनास्थळी दाखल झाली. कार्यकर्त्यांनीही शोधमोहीमेत सक्रिय सहभाग घेतला.

दरम्यान, आमदार अमोल खताळ यांच्या सूचनेनुसार सौ. नीलम खताळ यांनीही घटनास्थळी भेट देऊन प्रशासनाशी संपर्क साधत आवश्यक सूचना दिल्या.

शुक्रवारी गंगामाई घाटापासून मोठ्या पुलापर्यंत नदीपात्रात विविध यंत्रणांच्या मदतीने कसून शोधमोहीम राबविण्यात आली. मात्र, वृत्त लिहिपर्यंत ऋषिकेशचा कोणताही ठावठिकाणा लागलेला नव्हता.

दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना पुन्हा एकदा कडक इशारा देत, पुराच्या पाण्यात अथवा वेगाने वाहणाऱ्या नदीत कोणत्याही परिस्थितीत उतरू नये, स्वतःचा जीव धोक्यात घालू नये, असे आवाहन केले आहे.

# राज्यभर मुसळधार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यात सलग आठव्या दिवशीही पावसाचा जोर कायम असून विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी मुसळधार सरी कोसळत आहेत. नाशिक घाटमाथ्यासाठी रेड अलर्ट, तर छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील काही भागांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. गडचिरोलीत पूरस्थिती निर्माण झाली असून जळगाव, विदर्भ आणि नांदेडच्या किनवट तालुक्यात जोरदार पावसाची नोंद झाली आहे. दरम्यान, जून-जुलै या दोन महिन्यांत राज्यात सरासरीच्या तुलनेत केवळ ९६.४ टक्के, तर मराठवाड्यात ८२.१ टक्के पावसाची नोंद झाली आहेपुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे धरणांच्या पाणी पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे..

शिवसेनेचे युवा नेते व दिड्डी उद्योग समुहाचे संचालक
सीए प्रविण दिड्डी
यांना
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
शिवसेना संगमनेर

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
अत्याधुनिक लॉमिनार ऑपरेशन थिएटर
शस्त्रक्रिया
- मेंदुविकार शस्त्रक्रिया
- खुबा प्रत्योरोपण
- गुडघा प्रत्यारोपण
- पोटाच्या शस्त्रक्रिया
- किडनी शस्त्रक्रिया
- मुत्रविकार शस्त्रक्रिया
- दुर्बिणीद्वारे पोटाच्या व
- आतड्याच्या शस्त्रक्रिया
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ मोबा. ७०३८२७०३८२

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# मनोज जरांगे यांच्यावर आंदोलन करण्याची वेळ येणार नाही - ना. विखे



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी दिलेल्या आंदोलनाच्या इशाऱ्यावर आणि कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी भाजपवर केलेल्या 'धमकी व ऑफर'च्या दाव्यावर राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन सविस्तर भूमिका मांडली आहे. सरकारने मराठा समाजाच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतले असून अंमलबजावणीचा विस्तृत अहवाल जरांगेंना पाठवला जात आहे, त्यामुळे त्यांच्यावर आंदोलनाची वेळ येणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, अभिजीत दीपके यांनी हवेत गोळ्या मारण्याऐवजी धमकी देणाऱ्याचे नाव जाहीर करावे, असे खुले आव्हान दिले.

दिल्लीतील आंदोलन संपवून घरी परतल्यानंतर अभिजीत दीपके यांनी 'आंदोलनाच्या सुरुवातीला भाजपकडून धमक्या आणि पक्षात येण्याची ऑफर आल्याचा' आरोप केला होता. यावर विखे पाटील यांनी जोरदार पलटवार केला. अभिजीत दीपके यांचे वक्तव्य मी पाहिले. संशय निर्माण करण्यापेक्षा त्यांनी थेट समोर येऊन सांगावे की त्यांना कोणी धमकी दिली आणि कोणी ऑफर दिली? विनाकारण भारतीय जनता पार्टीला बदनाम करण्याचा प्रयत्न कोणीही करू नये. दीपके यांनी चांगले आंदोलन केले आणि सरकारनेही त्याची दखल घेऊन लोकसभेत कठोर कायदा (अँटी पेपर लीक विधेयक) मंजूर केला.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर
422605

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी
अंगावरून पांढरे जाणे
गर्भ न रहाणे
वारंवार गर्भपात होणे
गर्भाशयात गाठी
गर्भाशयाचा कर्करोग
♦ स्तनांची वाढ न होणे
♦ स्तनातून दूध न येणे
♦ स्तनात गाठी
♦ स्तनाचा कर्करोग
♦ योनी मार्गाची दुर्गंधी
♦ गुप्त अंगाला खाज
♦ विविध त्वचा विकार
♦ गुप्तरोग, गर्मी
♦ लघवीला जळजळ
♦ संभोगात रस न येणे
♦ संभोगा विषयीची भीती
♦ हस्तमैंथूनाची सवय
♦ लैंगिक विकृती
♦ मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग
- अतिदक्षता विभाग
- अपघात विभाग
- डायलिसीस विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- न्यूरोविभाग
- हृदयरोग विभाग
- मेडिसीन विभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- जॉईंट रिप्लेसमेंट
- स्पाईन सर्जरी
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25